## १. संविधानाची वाटचाल

**प्रश्न १ला. पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.**

१. ठरावीक मुदतीनंतर मुक्त आणि न्याय्य होणाऱ्या निवडणुका हे लोकशाहीचे यश आहे.
२. लोकसंख्या व विस्ताराने मोठ्या असेलल्या भारतात निवडणुका घेणे आव्हानात्मक आहे.
३. भारतातील लोकशाही जगातील मोठी लोकशाही मानली जाते.
४. सत्तेचे विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा गाभा आहे.
५. ७३,७४ व्या संविधानात केलेली दुरुस्ती अयोग्य होती.
६. माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारातील गोपनीयता वाढली.
७. शासन नागरीकांनमधील परस्पर विश्वास वाढण्यासाठी माहितीचा अधिकार मदत करतो.
८. लोकशाही ही सर्व समाजघटकांना समजावून घेण्याची प्रक्रिया आहे.
९. भारतीय संविधानाने अल्पसंख्यांकाविषयी तरतुदी केल्या आहेत.
१०. स्वातंत्र्योत्तर काळानंतर महिला सक्षमीकरण होणे दुरापास्त आहे.
११. महिलांसाठी राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्यात आली.
१२. संविधानाचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे आहे.

**प्रश्न २ रा. पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

१. लोकशाही विकेंद्रीकरण
२. सामाजिक न्याय व समता
३. हुंडा प्रतिबंधक कायदा
४. हक्काधारित दृष्टिकोन

**प्रश्न ३ रा. थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. भारताच्या संविधानाने कोणते उद्दिष्ट मांडले आहे?
२. भारताच्या संविधानाकडे कोणते साधन म्हणून पहिले जाते?
३. भारतात संविधानानुसार राज्यकारभार करण्यास केव्हापासून सुरुवात झाली?

४. लोकशाहीच्या शासनपद्धतीच्या संरचना आधारे लोकांना कोठे-कोठे थेट प्रतिनिधित्व मिळते ?
५. कोणत्या गोष्टीवरून भारतीय लोकशाहीचे यश दिसते?
६. भारताच्या संविधानाने मताधिकाराची व्याप्ती कशी वाढवली?
७. मतदाराचे वय २१ वर्षावरून १८ केल्यामुळे कोणते परिणाम झाले?
८. सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे कोणते फायदे होतात?
९. ७३,७४ संविधान दुरुस्तीमुळे कोणता परिणाम झाला?
१०. भारतीय नागरिकांना माहितीचा अधिकार का देण्यात आला?
११. माहितीच्या अधिकारामुळे शासनावरील नागरिकांचा विश्वास कसा वाढला?
१२. इ.स. २००० नंतर मिळालेल्या कोण-कोणत्या हक्कांमुळे भारतीय लोकशाही बळकट झाली ?
१३. सामाजिक न्याय व समता या मूल्यांचे स्पष्टीकरण करा.
१४. लोकशाही सर्वसमावेशक होण्याकरिता सर्व समाजघटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करत आहे?
१५. राखीव जागांचे धोरण कसे राबवले जाते?
१६. अल्पसंख्यांकांचे संरक्षण करण्यासाठी कोणत्या तरतुदी केल्या आहेत?
१७. महिला सक्षमीकरणासाठी कोणते प्रयत्न केले जातात?
१८. महिलासंबंधी कायद्यामुळे स्त्रीला कोणता न्याय मिळाला?
१९. लोकशाही बळकट करण्यासाठी न्यायालयांची भूमिका स्पष्ट करा.
२०. न्यायालयाने कोणकोणत्या महत्त्वाच्या विषयांवर निर्णय दिले आहेत?